| वर्ष - 7 | अंक - 252 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

प्रभू श्रीराम प्राण प्रतिष्ठा सोहळा दिन

जय श्री राम

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 22 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## धर्माधर्मात, जातीजातीत, जिल्ह्याजिल्ह्यात वाद निर्माण करणे

# हेच भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व!

## » युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांची पिंपरीत चौफेर टोलेबाजी

- "हृदयात राम आणि हाताला काम', 'प्राण जाये पर, वचन न जाये' असे आमचे हिंदुत्व
- युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचा नारा



**। पिंपरी । महाईन्यूज ।**

**"हृदयात राम आणि हाताला काम', 'प्राण जाये पर, वचन न जाये' असे आमचे हिंदुत्व आहे," असा नारा युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी रविवारी दिला. धर्माधर्मात, जातीजातीत, जिल्ह्याजिल्ह्यात वाद निर्माण करणे, हे भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व आहे, अशी टिकाही त्यांनी केली. केंद्र व राज्य सरकारचा कारभार आणि आमदार अपात्रतेसंदर्भात विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या चुकीच्या निर्णयाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सभा रविवारी पिंपरीत झाली. त्यात युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे बोलत होते.**

तत्पुर्वी निगडी येथील भक्तीशक्ती चौकात त्यांचे स्वागत केले. तेथून पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत दुचाकी फेरी काढली.

तिथे झालेल्या सभेस जिल्हा संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन अहिर, राज्य संघटक गोविंद घोळवे, एकनाथ पवार, मावळ लोकसभा मतदारसंघ संघटक संजोग वाघेरे, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे आदी उपस्थित होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हातात, 'ईव्हीम हटाव, संविधान बचाव' असा फलक होता. त्याला उद्देशून ठाकरे म्हणाले, "ईव्हीएमपेक्षाही खोके सरकारपासून महाराष्ट्र बचाव, असा नारा लावायची वेळ आलेली आहे.

दोन पक्ष व एक कुटुंब फोडून अवकाळी सरकार आमच्या डोक्यावर बसवलं आहे. चाळीस चोरींची ही टोळी आहे. त्यांचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री घटनाबाह्य आहेत. पण, सध्याचे वर्ष निवडणुकांचे असून आमचे आहे. सुलभा उभाळे, गोविंद घोळवे यांचीही भाषणे झाली. काही कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला, त्यांचे स्वागत ठाकरे यांनी केले.

### उमेदवारीचा निर्णय वरिष्ठ घेतील

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी शहराध्यक्ष तथा माजी महापौर संजोग वाघेरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात गेल्या महिन्यात प्रवेश केला आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातून त्यांना उमेदवारी मिळणार का? असे सभा संपल्यानंतर पत्रकारांनी विचारले असता, आदित्य ठाकरे म्हणाले, "संजोग वाघेरे यांनी संघटक म्हणून जबाबदारी घेतलेली आहे. लोकसभा वा विधानसभेच्या उमेदवारीबाबत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि वरिष्ठ नेते निर्णय घेत असतात.

तिकिट वाटपात मी जात नाही. पण, केवळ मावळच नाही तर, राज्यातील प्रत्येक लोकसभा व विधानसभा मतदारसंघ आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. गेल्या दोन वर्षात खूप अन्याय महाराष्ट्र सहन करत आहे.

### राज्यातील प्रत्येक जागेवर महाविकास आघाडी जिंकणं महत्त्वाचं

आमच्या हक्काचा रोजगार असलेला प्रत्येक उद्योग परराज्यात पाठविला जात आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक क्षेत्र कोलमडलं आहे. मुख्यमंत्री अकार्यक्षम आहेत. त्यांच्यावर उद्योजकांचा विश्वास नसावा, त्यामुळे ते अन्य राज्यात जात असावेत. हे थांबविण्यासाठी आणि दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जागेवर महाविकास आघाडी जिंकणं महत्त्वाचं आहे. आमची स्थानिक टीम शहरात चांगले काम करीत आहे. शहरात नागरीकरण वाढत आहे.

> पुढील दोन महिन्यांनी लोकसभेची निवडणूक होईल, कदाचित विधानसभेचही निवडणूक होईल. त्यानंतर आमचे सरकार येणार आहे. त्यावेळी घोटाळेबाज मंत्र्यांना अगोदर जेलमध्ये टाकू," असा इशारा देत, मुख्यमंत्र्यांमध्ये हिम्मत असेल तर, त्यांनी राज्यहिताचा निर्णय घेऊन दाखवावा.
>
> **-आदित्य ठाकरे,** युवा सेना प्रमुख, शिवसेना (उबाठा)

### उद्योग मंत्री त्यांच्याच खात्याविषयी अनभिज्ञ

**» देशभरातून लोक इथे आले आहेत. एक चांगलं शहर पिंपरी-चिंचवड होऊ शकते. आमच्या सरकारने शहरांच्या विकासावर भर दिला होता. पुढील पन्नास वर्षांचा विचार करून शाश्वत विकास साधला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे." उद्योगमंत्री उदय सामंत यांना त्यांच्या खात्याविषयीच फारसी माहिती नाही, अशी टिका करत 'इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सर्व विभागांची सांगड घालणं गरजेचे असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. ते म्हणाले. "अयोध्येत आम्ही नंतर जाणार आहोत. उद्या सोमवारी नाशिकच्या काळाराम मंदिरात जात आहोत."**

# राजकारण लोकांच्या भल्यासाठी करा!

## आम्ही महिला ‘मर्यादा पुरुषोत्तम राम’चं म्हणू : सुप्रिया सुळे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे या धनकवडी येथील एका कार्यक्रमास आल्या होत्या. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी भाजप नेत्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांच्या भाषणामधून चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले. यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सत्ता काय असते, मी ते आयुष्य अगदी जवळून पाहिलं आहे. सत्तेचं एकच कारण आहे. ते म्हणजे तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवणं, त्यामुळे सत्तेमधील आमदार, खासदार आणि आम्ही बघा, अशा शब्दांत सत्ताधारी पक्षांवर त्यांनी टीका केली.**





तसेच त्या पुढे म्हणाल्या की, माझे वडील फार म्हणजे फार कमी बोलतात आणि ते कोणालाही सल्ला देण्यास जात नाही. पण माझ्या वडिलांची बदनामी करण्यासाठी अदृश्य शक्ती त्यांच्या मागे लागली आहे. मला ती अदृश्य शक्ती माहिती नाही. पण मुख्यमंत्री सतत म्हणतात की,अदृश्य शक्ती महाराष्ट्र चालवते, त्यामुळे मी विचार करायला लागल्यावर अनेक प्रश्न निर्माण झाले. तांत्रिक मांत्रिक असेल किंवा वेगळी कोणती ऊर्जा आहे का? असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपच्या नेत्यांवर सुळे यांनी टीका केली.तसेच त्या पुढे म्हणाल्या की, राजकारण जरुर करावे, ते देखील मुद्देसुद करावे आणि ते राजकारण लोकांच्या भल्यासाठी करावे. आता मला एक सांगा की, परवा आमच्या रोहितला ईडी मार्फत नोटीस आली. त्यामुळे तुमच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे, असा सवाल उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांना विचारत, त्या पुढे म्हणाल्या की, तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवण्यासाठी सत्ता असते. त्यामुळे जर मी अदृश्य शक्तीच्या जागी असते. तर मी ईडी, सीबीआय या भानगडीत पडले नसते आणि गॅसचे दर कमी केले असते अशा शब्दांत पुन्हा एकदा भाजप नेत्यांवर त्यांनी टीका केली.तुमची ही लेक संघर्षाला कधीही घाबरत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख दुःख असतात. त्यामुळे नेहमी म्हणतात ना, प्रत्येकाच्या घरी मातीच्याच चुली ना, त्यामुळे संघर्षात एक वेगळीच मजा असते. आता कोर्टात प्रकरण गेल्याने और लढेंगे, ही एक वेगळीच गंमत असून तत्व, आदर आणि प्रेमाची ही लढाई आहे. ही लढाई काही वैयक्तिक नाही. माझ्या आईचे एक संस्कार आहेत. आपण कोणाच्याही एका ताटात जेवण केले असेल ना, त्याच्या विरोधात कधीच बोलायाचे नाही. ते उपकार कधीच विसरू द्यायचे नाही, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टोला लगावला.अयोध्येत प्रभू श्रीराम यांच्या भव्य दिव्य अशा मंदिराचं उद्घाटन उद्या २२ जानेवारी रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. त्याच दरम्यान पुण्यातील एका कार्यक्रमात सुप्रिया सुळे भाषण करतेवेळी म्हणाल्या की आता ते जय श्रीराम म्हणतात, पण सुषमा स्वराज या नेहमी मर्यादा पुरुषोत्तम राम म्हणत असायच्या. त्यामुळे ते आता जरी जय श्रीराम म्हणत असले तरी आम्ही महिला ‘मर्यादा पुरुषोत्तम राम’च म्हणू. सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, आम्ही मर्यादेत राहूनच राजकारण आणि समाजकारण करू. प्रभू श्रीराम यांच्यामध्ये जेवढे गुण आहेत. ते सर्व गुण आपल्यामध्ये येऊ शकत नाही. आपण अनेक चुका करतोच, पण त्यांचे गुण जेवढे आत्मसात करता येतील, त्यासाठी प्रयत्न करुयात, असे आवाहन उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांनी केले.बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे या धनकवडी येथील एका कार्यक्रमास आल्या होत्या. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी भाजप नेत्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांच्या भाषणामधून चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले.

### आदर आणि प्रेमाची ही लढाई

» राजकारण जरुर करावे, ते देखील मुद्देसुद करावे आणि ते राजकारण लोकांच्या भल्यासाठी करावे. आता मला एक सांगा की, परवा आमच्या रोहितला ईडी मार्फत नोटीस आली. त्यामुळे तुमच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे, असा सवाल उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांना विचारत, त्या पुढे म्हणाल्या की, तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवण्यासाठी सत्ता असते. त्यामुळे जर मी अदृश्य शक्तीच्या जागी असते. तर मी ईडी, सीबीआय या भानगडीत पडले नसते आणि गॅसचे दर कमी केले असते अशा शब्दांत पुन्हा एकदा भाजप नेत्यांवर त्यांनी टीका केली.तुमची ही लेक संघर्षाला कधीही घाबरत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख दुःख असतात. त्यामुळे नेहमी म्हणतात ना, प्रत्येकाच्या घरी मातीच्याच चुली ना, त्यामुळे संघर्षात एक वेगळीच मजा असते. आता कोर्टात प्रकरण गेल्याने और लढेंगे, ही एक वेगळीच गंमत असून तत्व, आदर आणि प्रेमाची ही लढाई आहे.

---

# आम्ही आज अयोध्येला जाणार होतो : अजित पवार

## अजित पवारांनी सांगितलं प्राणप्रतिष्ठेला न जाण्याचं कारण

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येत (उत्तर प्रदेश) नव्याने बांधल्या जात असलेल्या मंदिरात सोमवारी (२२ जानेवारी) श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. देशभर सध्या या सोहळ्याची चर्चा आहे. या दिवशी श्री रामजन्मभूमी ट्रस्टने अयोध्येत मोठ्या उत्सवाचं आयोजन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष मोहन भागवत या तिघांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडेल.**

या उत्सवाचं अनेकांना निमंत्रण पाठवलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, मोठे नेते, राम मंदिरासाठी आंदोलन करणारे कारसेवक, खेळाडू, कलाकार आणि साधू-संतांसह तब्बल ७,००० हून अधिक लोकांना या उत्सवाचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. अयोध्येत या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी चालू आहे. सोमवारी दुपारी १२.१५ ते १२.४५ दरम्यान मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. रामजन्मभूमी ट्रस्टने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना (देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार) या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं आहे. परंतु, मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या सोहळ्याला जाणार नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबतची माहिती दिली. अजित पवार यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आपल्या राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. देशातल्या इतर काही राज्यांनी अर्धा दिवस सुट्टी जाहीर केली आहे.अजित पवार म्हणाले, राज्यातल्या शासकीय इमारतींमध्ये रोषणाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणारे रामभक्त त्यांच्या इच्छेप्रमाणे आणि तिथल्या पद्धतीप्रमाणे कार्यक्रम करणार आहेत. अनेक कार्यालयांमध्ये अशा कार्यक्रमांची तयारी करण्यात आली आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाणार का? या प्रश्नावर उत्तर देताना अजित पवार म्हणाले, मला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या सोहळ्याचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. खरंतर, मी आणि मुख्यमंत्री आजच या कार्यक्रमासाठी अयोध्येला जाणार होतो.

### देशभर सध्या या सोहळ्याची चर्चा

» परंतु, काल मी उरूळी कांचनला असताना मला मुख्यमंत्र्यांचा फोन आला. ते मला म्हणाले, ‘आपल्याला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं आमंत्रण आहे. मात्र उद्या (२२ जानेवारी) या कार्यक्रमाला केवळ आपण दोघेच न जाता काही दिवसांनी आपलं संपूर्ण मंत्रिमंडळ घेऊन अयोध्येला जाऊया. आपण एक तारीख ठरवू आणि त्या दिवशी अयोध्या दौरा करू. आपण दोघेच तिथे जाणं आणि बाकीच्यांना उद्या तिथे जाता न येणं (सुरक्षेच्या कारणास्तव) योग्य नाही. त्यामुळे आपण नंतर सर्वांना घेऊनच जाऊया.’ कारण उद्या इतरांना तिथे जाण्याची परवानगी नाही. राज्याच्या प्रमुखांनी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आम्ही उद्या अयोध्येला जाणार नाही.अयोध्येत (उत्तर प्रदेश) नव्याने बांधल्या जात असलेल्या मंदिरात सोमवारी (२२ जानेवारी) श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. देशभर सध्या या सोहळ्याची चर्चा आहे.

## मराठा क्रांती मोर्चाच्या पार्श्वभूमीवर

# प्राथमिक शाळांना सुट्टी द्या!

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे-पाटील व लाखो कार्यकर्ते येत्या बुधवारी पिंपरी चिंचवड शहरातून मुंबईकडे मार्गस्थ होणार आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी केली आहे.**



याबाबत सचिन चिखले यांनी मनपा आयुक्तांना दिलेल्या (PIMPRI)निवेदनात म्हटले आहे की, मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चाचे वादळ बुधवारी मुंबईला धडक देणार आहे. या मोर्चाची तयारी पूर्ण झाली असून,लाखो आंदोलक महामोर्चात सामील झाले आहेत.

अंतरवाली सराटी येथून पदयात्रेला शनिवारी सुरुवात प्रारंभ झाला आहे. ही पदयात्रा बुधवारी (ता.२४) पिंपरी चिंचवड शहरातील सांगवी फाटा येथे येणार आहे. तेथून जगताप डेअरी, काळेवाळी फाटा, डांगे चौक मार्गे चाफेकर चौक, चिंचवड स्टेशन, आकुर्डी मार्गे भक्ती-शक्ती समूह शिल्प येथे पोहोचेल. या मोर्चामुळे गर्दीचा उच्चांक मोडण्याची दाट शक्यता आहे.

#### पदयात्रा सुरळीत पार पडावी...

» ही पदयात्रा सुरळीत पार पाडावी. यासाठी पालिका प्रशासन, पोलीस प्रशासन व मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयाने नियोजन करीत आहेत. या मोर्चामुळे शालेय वाहतुकीस अडचण निर्माण होऊ नये अथवा विद्यार्थी वाहतूक कोंडीमध्ये अडकू नयेत, या दृष्टिकोनातून बुधवारी सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी केली आहे.

---

## शहरातील विविध ठिकाणी श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे थेट प्रक्षेपण कराः शत्रूघ्न काटे

। पिंपरी चिंचवड।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**





**पिंपरी चिंचवड शहरातील विविध ठिकाणी असलेल्या VMD स्क्रीन वर प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करा अशी मागणी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी केली आहे. शत्रुघ्न काटे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना लेखी निवेदन दिले आहे**

.

शत्रुघ्न काटे यांनी निवेदनात म्हटले आहे की, शहरातील विविध ठिकाणी असलेल्या VMD स्क्रीन वर प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे. पिंपरी चिंचवड शहरात स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत जागोजागी VMD स्क्रीन उभे करण्यात आले आहे. देशातील जनतेचे गेली अनेक वर्षे केवळ स्वप्नच ठरलेले आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे स्वप्न येत्या २२ जानेवारीला सत्यात उतरत आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा एक ऐतिहासिक सोहळा व्हावा अशी इच्छा देशाच्या प्रत्येक भारतीयांची आहे. प्रभू श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला होणार आहे. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी सर्व रामभक्तांना भावनिक आवाहन केले आहे की, २२ जानेवारी रोजी सर्वांनी अयोध्येत येणे टाळावे कारण की जनसमुदाय सागर अयोध्येत आल्यास सुख सोयी सुविधांचा तुटवडा उद्भवू शकतो परिणाम रामभक्तांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊ शकते.

देशाचे पंतप्रधान यांनी केलेल्या आवाहनाला एक सकारात्मक प्रतिसाद देत जर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी उभे करण्यात आलेल्या VMD स्क्रीन वर रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केल्यास पिंपरी चिंचवड परिसरातील रामभक्तांना या ऐतिहासिक क्षणाचा भाग बनता येईल तसेच आपल्या या पुढाकाराने नागरिकांना या भव्यदिव्य कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यास मदत होईल.

---

## मना मनांत श्रीरामचा नारा... घराघरांत करु उत्सव साजरा!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचे आवाहन

।पिंपरी चिंचवड।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त देशभरात मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत दिवाळी साजरी करूया. "मनामनांमध्ये श्रीरामचा नारा देवूया आणि घराघरांमध्ये उत्सव साजरा करूया.." असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**



> भारताच्या इतिहासामध्ये २२ जानेवारी २०२४ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. आदर्श पूत्र, राजा, बंधू आणि धर्माचरणामध्ये मर्यादापुरषोत्तम प्रभू श्री रामचंद्र हे हिंदू धर्म आणि अखंड भारत या संकल्पनेचा खरा दुवा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा होत आहे, हा निश्चितच सर्व भारतीयांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक सोहळा आहे. त्यामुळे घराघरांमध्ये दीपप्रज्वलन करुन दिवाळी आणि उत्सव साजरा करूया, असे आवाहन करतो.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे प्रभू श्रीराम मंदिराचे स्वप्न ५०० वर्षांनी पूर्ण होत आहे. या मंदिराचे राष्ट्रार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. यानिमित्त देशभरामध्ये उत्सव साजरा होत आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, प्रभू श्रीराम हे भारतीयांच्या अस्मितेचे प्रतीक आहे. अयोध्या येथे मंदिर व्हावे. यासाठी अनेक पिढ्यांनी संघर्ष केला. न्यायालयीन लढा उभारला. कार सेवकांनी प्रसंगी बलिदान दिले आहे. १५ व्या शतकापासून आम्हा हिंदू बांधवांना या मंदिराची प्रतीक्षा होती. आमच्या अनेक पिढ्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे. 'रामराज्य' ही संज्ञासुद्धा प्रभू श्रीराम यांच्या प्रेरणेतून आलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी 'रामराज्य'च्या आदर्शातूनच स्वराज्याची प्रेरणा घेतली. असे प्रभू श्रीराम यांचे जन्मभूमी मंदिरामध्ये आगमन होत आहे. हा सोहळा आम्हाला पाहण्याचे भाग्य मिळाले. यापुढील हजारो पिढ्यांसाठी हे मंदिर आणि प्रभू श्रीराम प्रेरणा देत राहतील.




# तुम्ही राहता त्यांच्या 'समृद्ध भारता'त?

**भारत कसा समृद्ध होतो आहे, याची प्रसारमाध्यमे उत्साहाने माहिती देत आहेत. या 'समृद्ध भारता'मध्ये दरडोई वार्षिक उत्पन्न दहा हजार अमेरिकी डॉलर्स किंवा सुमारे आठ लाख ४० हजार रुपये आहे. या 'समृद्ध भारता'चा विकासाचा वेग कसा चक्रवाढ व्याज दरासारखा वाढता आणि अकल्पित आहे.**

या 'समृद्ध भारता'मध्ये उपभोग कसा वाढतो आहे आणि हा 'समृद्ध भारत' वर्षभरात पाच ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सची अर्थव्यवस्था कशी बनेल असे दावे माध्यमे करत आहेत.भारत समृद्ध होतो आहे, याचा मला आनंदच आहे. गोल्डमन सॅक्सच्या अहवालानुसार, २०२६ पर्यंत या 'समृद्ध भारता'ची लोकसंख्या १० कोटी किंवा भारताच्या एकूण लोकसंख्येच्या अंदाजे सात टक्के असेल. गोल्डमन सॅक्सला फक्त 'समृद्ध भारता'चीच चिंता का आहे आणि बाकीच्या (९३ टक्के) भारतीय लोकांची का नाही? कारण गोल्डमन सॅक्स ही फक्त श्रीमंतांचीच बँक आहे. १० कोटी लोकसंख्या असलेला 'समृद्ध भारता' हा जर वेगळा देश असता, तर तो मध्यम-उत्पन्न असलेला आणि जगातला १५ व्या क्रमांकाचा मोठा देश असला असता. हे श्रीमंत भारतीय (सन्माननीय अपवादांसह) बचत करतात, खर्च करतात, गुंतवणूक करतात, उधळपट्टी करतात,



पैसा दडवून ठेवतात आणि त्यांचे उत्पन्न, संपत्ती आणि इतर सर्व गोष्टींबद्दल आरडाओरडा करतात. 'समृद्ध भारत' एखादी वस्तू विकत घेतो आणि वापरतो, तेव्हा सगळे भारतीय त्या वस्तूची खरेदी करतात आणि तिचा उपभोग घेतात असा भ्रम निर्माण होतो. 'समृद्ध भारत' हा जणू उर्वरित भारतच मानला जातो. उर्वरित भारतातले ९३ टक्के लोक माफक उत्पन्न कमावतात. त्यांच्यापैकी थोडेफार लोक बरे जीवन जगतात तर बहुसंख्य लोक दोन वेळचे पोटभरीचे जेवण मिळावे यासाठी काबाडकष्ट करतात.एकूण भारताच्या तुलनेत 'समृद्ध भारत' अगदी लहान भाग म्हणता येईल असा आहे. दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (NNI) ही संकल्पनाच अर्थहीन आहे. कारण 'समृद्ध भारत' उर्वरित भारताची सरासरी वर खेचतो. अधिक संबंधित आकडेवारी म्हणजे सरासरी उत्पन्न. निम्म्या भारतीय लोकांचे (७१ कोटी) वार्षिक उत्पन्न ३,८७,००० रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, किंवा मासिक उत्पन्न सुमारे ३२,००० किंवा त्याहून कमी आहे. आर्थिक शिडीवर जितके खाली जाल तितके उत्पन्न कमी होत जाते. तळातील १० किंवा २० टक्के लोकसंख्या एका महिन्यात काय कमावते? माझा साधारण अंदाज आहे की तळाच्या १० टक्के लोकांचे दरडोई मासिक उत्पन्न सहा हजार रुपये आणि तळाच्या ११-२० टक्के लोकांचे दरडोई मासिक उत्पन्न १२ हजार रुपये असावे. या पगारात ते कसे रहात असतील, काय खात असतील, त्यांना मिळणारी आरोग्यसेवा या सगळयाबद्दल तर विचारही न केलेला बरा. यूएनडीपीच्या बहु-आयामी दारिद्रय निर्देशांकानुसार, २२.८ कोटी लोक किंवा सुमारे १६ टक्के लोक दारिद्रयरेषेखाली आहेत. (निती आयोगाच्या मते, हे प्रमाण १६.८ कोटी किंवा ११.२८ टक्के आहे.

सरासरी उत्पन्नापेक्षा कमी कमावणाऱ्या २१-५० टक्के लोकांची स्थिती तळाच्या २० टक्क्यांपेक्षा थोडीशी चांगली आहे. ते उपाशी झोपत नाहीत किंवा त्यांच्या डोक्यावर छप्पर आहे, पण त्यांच्या जगण्यात अनिश्चितता आहे. बहुतेक खासगी नोकऱ्यांमध्ये नोकरीची सुरक्षा किंवा सामाजिक सुरक्षा फायदे नाहीत. उदाहरणार्थ, सरकारच्या ई- श्रम पोर्टलवर नोंदणीकृत २.८ कोटी घरकामगार किमान वेतनावर काम करतात (वास्तवात यांची संख्या कितीतरी पट अधिक आहे). सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी वगळता, इतर सगळया खासगी कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर सतत नोकरी गमावण्याची टांगती तलवार असते. २०२३ मध्ये, फक्त टेक कंपन्यांनी दोन लाख ६० हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले. हे सगळे उच्चविद्याविभूषित होते. १०० स्टार्ट अप्सनी २४ हजार रोजगार कमी केले. पंचतारांकित हॉटेल्स, रिसॉर्ट्स, चकचकीत मॉल्स, लक्झरी ब्रँड स्टोअर्स, मल्टिप्लेक्स सिनेमा, खाजगी जेट्स, डेस्टिनेशन वेडिंग, लॅम्बोर्गिनी मध्ये विक्रमी १०३ मोटारगाडया विकल्या आहेत) इत्यादी गोष्टी समृद्ध भारताच्या निदर्शक आहेत. समृद्ध भारत हे उच्च प्रतीचे जीवनमान टिकवून ठेवण्यास सक्षम आहे.

## संपादकीय »

### महाराष्ट्र परी

***केंद्राच्या पाठिंब्यामुळे महाराष्ट्रासाठी परिस्थिती प्रतिकूल नसली तरी ती अत्यंत अनुकूल आहे असेही नाही, हे आपले राज्यकर्त्यांनी ओळखल्यास बरे..***

दावोस येथे आल्प्सच्या बर्फाच्छादित कुशीत गुंतवणूकदार, उद्योगपती आणि धोरणकर्त्यांच्या वार्षिक कुंभमेळयात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री काही हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक वायद्यांची घोषणा करीत असताना त्याच वेळी दिल्लीतून महाराष्ट्र नवउद्यमींच्या गुंतवणुकीत मागे पडल्याची वार्ता ही दावोसोत्सवाचा बर्फ वितळवणारी ठरते. अलीकडे हे महाराष्ट्राच्या बाबत वारंवार होऊ लागले आहे हे कटुसत्य. एखादा प्रकल्प या राज्यातून दुसरीकडे जाणे इतक्यापुरतेच ते मर्यादित नाही. दोन वर्षांपूर्वी, २०२२ साली, तमिळनाडू, तेलंगणा आणि गुजरात या राज्यांनी व्यापार-उद्योगस्नेहतेच्या त्याच वर्षी 'निती आयोग'रचित 'निर्यातस्नेही' राज्यांच्या गुणवत्ता तालिकेत गुजरात हा सहोदर आपल्यापेक्षा पुढे गेल्याचे दिसले. त्याही आधी उद्योगस्नेही धोरणांत अन्य राज्ये महाराष्ट्रावर सातत्याने मात करत असल्याचे दिसून आले.

**इस्रायल-हमास संघर्षांमुळे एकूणच पश्चिम आशियातील परिस्थिती स्फोटक बनल्याच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची इराणभेट महत्त्वाची ठरते. जयशंकर तेहरानमध्ये होते त्या काळातच इराणने सीरिया, इराक आणि मुख्य म्हणजे पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतामध्ये थेट क्षेपणास्त्र हल्ले केले.**

# इराणशी दोस्ती निभावण्याची कसरत

सात ऑक्टोबर रोजी गाझा संघर्ष सुरू झाल्यानंतर इराणच्या भूमीवरून अशा प्रकारचे हल्ले प्रथमच झाले आहेत. या हल्ल्यांमागची कारणे बहुधा वेगवेगळी होती. इराकमधील एरबिल शहरात केलेल्या हल्ल्यांचे एक लक्ष्य इस्रायली गुप्तचर यंत्रणा मोसादचे मुख्यालय होते.सीरियातील हल्ल्यांचे लक्ष्य आयसिसचे तळ होते. आयसिस किंवा इस्लामिक स्टेटने काही दिवसांपूर्वी इराणच्या केरमन शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली होती. पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतामध्ये 'अल अदल' या दहशतवादी संघटनेच्या तळावर इराणकडून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले झाले. याची गंभीर दखल पाकिस्तानने घेतली आहे. या हल्ल्यांमुळे पश्चिम आशियातील परिस्थिती चिघळू शकते. कारण इराणने स्वत:हून हल्ले करून मोठीच जोखीम पत्करलेली दिसते. एरवी हुती, हमास, हेझबोला अशा संघटनांच्या माध्यमातून



पश्चिम आशियात इस्रायलपासून सौदी अरेबियापर्यंत अनेक देशांच्या कुरापती काढण्यामागे इराणचा हात असल्याचे बोलले जातेच. आता थेट हल्ले केल्यामुळे अप्रत्यक्षपणा आणि अदृश्यतेचा फायदा इराणला मिळणार नाही. इस्रायल-हमास संघर्षांची व्याप्ती वाढेल असा अंदाज सुरुवातीला व्यक्त करण्यात आला होता. परंतु बहुतेक सर्व अरब देशांनी समंजस आणि नेमस्त भूमिका घेतल्यामुळे ही भीती बरीचशी फोल ठरली. परंतु इस्रायलच्या विरोधात आणि पॅलेस्टाइन-हमासच्या समर्थनार्थ येमेनस्थित हुथी बंडखोरांनी लाल समुद्रातील जहाजांना लक्ष्य केल्यामुळे मूळ संघर्षांची व्याप्ती भलतीकडेच सरकली. हुथी बंडखोरांना इराणकडून नैतिक, शस्त्रास्त्रे आणि बहुधा आर्थिक पाठबळ मिळते.लाल समुद्रातील हुथी हल्ल्यांचे जगभर पडसाद उमटतात, याचे कारण भूमध्य समुद्रातून सुएझ कालव्यामार्गे लाल समुद्र व एडनच्या आखातातून अरबी समुद्र ते हिंद महासागर असा एक अत्यंत व्यग्र असा जलमार्ग आहे. या मार्गे व्यापारवस्तू, धान्य, इंधने, भाजीपाला अशा अनेक जीवनावश्यक वस्तूंची जलवाहतूक होत असते. परवा अमेरिका आणि ब्रिटनने संयुक्तपणे येमेनमधील काही हुथी तळांवर हल्ले केले. या हल्ल्यांनी ईप्सित परिणाम साधलेला दिसत नाही. कारण अगदी मंगळवारीच हुथींकडून अमेरिकी नौदल नौकांवर लाल समुद्रात प्रतिहल्ले झाले. गाझातून इस्रायल माघार घेत नाही तोवर हल्ले करत राहणार ही हुथींची भूमिका. ती इराणचीही भूमिका आहे. त्यामुळे संघर्षांची झळ भारतालाही बसू लागली आहे. जयशंकर यांच्या इराण दौऱ्याला यामुळे महत्त्व होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोर्चाच्या भीतीने मुख्यमंत्र्यांचा दौरा रद्द?

## » मुख्यमंत्री 22 जानेवारीला अयोध्येला जाणार नाहीत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येतील राम मंदिरात उद्या (२२ जानेवारी) श्री रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. श्रीरामजन्मभूमी ट्रस्टने देशभरातील अनेक मान्यवरांना, केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, कारसेवक, उद्योगपती, क्रिकेटपटू, कलाकार आणि साधू-संतांना या कार्यक्रमाचं निमंत्रण पाठवलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनादेखील या कार्यक्रमाचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. पंरतु, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या सोहळ्याला जाणार नाहीत.**



एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनी स्पष्ट केलं आहे की, आम्ही आज (२१ जानेवारी) अयोध्येला जाणार होतो. परंतु, आज केवळ आम्ही जाण्याऐवजी काही दिवसांनी संपूर्ण मंत्रिमंडळ घेऊन अयोध्येला जाणार आहोत. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील राज्य सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजबांधवांना घेऊन मुंबईत धडक देणार आहेत. बीडमधून त्यांच्या मोर्चाला सुरुवात झाली आहे. जरांगे पाटील यांनी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्याचा आणि आझाद मैदानात बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या यापूर्वीच्या आंदोलनांनीदेखील राज्य सरकारला कोंडीत पकडलं होतं. त्यामुळे मनोज जरांगे पुन्हा एकदा मोठ्या आंदोलनाच्या पावित्र्यात असल्यामुळे राज्य सरकार सावध आहे. मराठा मोर्चाचा धसका घेऊन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अयोध्येला गेले नाहीत अशी चर्चा चालू आहे. यावर राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ म्हणाले, या अफवांना काही अर्थ नाही. अनेक लोक अयोध्येला गेले नाहीत. कित्येक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना या कार्यक्रमाचं निमंत्रणदेखील मिळालेलं नाही असं माझ्या वाचनात आलं आहे. परंतु, मंदिर समितीने इतर अनेकांना निमंत्रणं दिल्यामुळे सोमवारी तिथे खूप गर्दी असणार आहे. केवळ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनाच कायदेशीरपणे निमंत्रण देण्यात आलं आहे. त्यामुळे तुम्ही पत्रकार जे काही बोलताय त्यात काही तथ्य नाही. उलट मुख्यमंत्री म्हणाले आहेत की, तिथली गर्दी कमी झाली की, आपण संपूर्ण मंत्रिमंडळाला घेऊन अयोध्येला जाऊ. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याबाबत एक पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटलं आहे, अयोध्येमध्ये सोमवारी श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. या ऐतिहासिक आणि नेत्रदीपक सोहळ्याचे आम्हाला निमंत्रण आहेच. देशवासियांसाठी अभिमानास्पद अशा या अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार फक्त मी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार अशा तिघांनीच होण्याऐवजी संपूर्ण मंत्रिमंडळ, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि राज्यातील रामभक्त अशा सर्वांना घेऊन प्रभू श्रीरामाचं दर्शन आम्ही घेणार आहोत. अयोध्येतल्या दर्शनाची तारीख आणि वेळ लवकरच ठरवत आहोत. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील राज्य सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजबांधवांना घेऊन मुंबईत धडक देणार आहेत. बीडमधून त्यांच्या मोर्चाला सुरुवात झाली आहे.

### मुंबईत चक्काजाम आंदोलन

» जरांगे पाटील यांनी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्याचा आणि आझाद मैदानात बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या यापूर्वीच्या आंदोलनांनीदेखील राज्य सरकारला कोंडीत पकडलं होतं. त्यामुळे मनोज जरांगे पुन्हा एकदा मोठ्या आंदोलनाच्या पावित्र्यात असल्यामुळे राज्य सरकार सावध आहे. मराठा मोर्चाचा धसका घेऊन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अयोध्येला गेले नाहीत अशी चर्चा चालू आहे. यावर राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ म्हणाले, या अफवांना काही अर्थ नाही. अनेक लोक अयोध्येला गेले नाहीत. कित्येक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना या कार्यक्रमाचं निमंत्रणदेखील मिळालेलं नाही असं माझ्या वाचनात आलं आहे. परंतु, मंदिर समितीने इतर अनेकांना निमंत्रणं दिल्यामुळे सोमवारी तिथे खूप गर्दी असणार आहे. केवळ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनाच कायदेशीरपणे निमंत्रण देण्यात आलं आहे. उलट मुख्यमंत्री म्हणाले आहेत की, तिथली गर्दी कमी झाली की, आपण संपूर्ण मंत्रिमंडळाला घेऊन अयोध्येला जाऊ.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याबाबत एक पोस्ट केली आहे.

# मराठा समाजाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सल्ला

## » जरांगे पाटील यांना अनेकदा समजून सांगण्याचा प्रयत्न केला

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातत्याने मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करत होते. बच्चू कडू यांच्यासह अन्य दूत त्यांच्याकडे पाठवले होते. या प्रक्रियेला वेळ जात आहे. त्यामुळे आणखी वेळ देण्याची मागणी केली होती. परंतु मराठा समाज ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने जरांगे पाटील यांच्यासह समाज मुंबईला चालला आहे. अजूनही त्यांनी थांबावे, अशी सरकारची इच्छा आहे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.**

बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते.पवार म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी जरांगे पाटील यांना अनेकदा समजून सांगण्याचा प्रयत्न केला. आरक्षणाबाबत राज्य सरकार काय करत आहे, हे सांगितले. राज्य सरकारच्या कामाला प्रतिसाद द्यावा, मुंबईकडे कूच करू नये, अशी मागणी केली. मागासवर्ग आयोगासंदर्भातील माहिती काढण्यासाठी काही वेळ लागतो आहे. परंतु जरांगे पाटील यांनी, जेवढा वेळ पाहिजे तेवढा दिलेला आहे, असे सांगत मुंबईकडे ते आता निघाले आहेत. लोकशाहीत प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. संविधानाचा आदर राखून प्रत्येक जण आपला निर्णय घेवू शकतो.



आम्ही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यांनी अजूनही थांबावे अशी सरकारची इच्छा आहे. परंतु आज मराठा समाज ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. शेवटी प्रत्येकाला आपापली भूमिका घेण्याचा अधिकार आहे.अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापनेसाठी मुख्यमंत्री व मला निमंत्रण आले होते. परंतु अन्य मंत्र्यांना सोमवारी तेथे नेणे शक्य नव्हते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी यापुढील काळात सगळ्या मंत्रीमंडळाला घेवून अयोध्येला जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार तारीख ठरवून लवकरच आम्ही जावू असे सांगत अजित पवार म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ मंदिर उभारणीचा निश्चय केला. तो यानिमित्ताने पूर्णत्वाकडे जात आहे. राज्य शासनाने सुट्टी जाहीर केली असून शासकीय इमारतींवर रोषणाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत.लोकशाहीत प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. संविधानाचा आदर राखून प्रत्येक जण आपला निर्णय घेवू शकतो. आम्ही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो आहे.

### प्रत्येकाला भूमिका घेण्याचा अधिकार

» अजूनही थांबावे अशी सरकारची इच्छा आहे. परंतु आज मराठा समाज ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. शेवटी प्रत्येकाला आपापली भूमिका घेण्याचा अधिकार आहे.अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापनेसाठी मुख्यमंत्री व मला निमंत्रण आले होते. परंतु अन्य मंत्र्यांना सोमवारी तेथे नेणे शक्य नव्हते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी यापुढील काळात सगळ्या मंत्रीमंडळाला घेवून अयोध्येला जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार तारीख ठरवून लवकरच आम्ही जावू असे सांगत अजित पवार म्हणाले.

# अख्खा देव एका व्यक्तीनं ताब्यात घेतला!

## मल्लिकार्जुन खरगेंचा पीएम मोदींवर कडाडून हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अयोध्येत उद्या सोमवारी (22 जानेवारी) होणाऱ्या रामलला प्राण प्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. आसाममधील नागाव येथे एका सभेला संबोधित करताना ते म्हणाले की, एका व्यक्तीने संपूर्ण देव ताब्यात घेतला आहे. ते म्हणाले की, "पंतप्रधान मोदी राम मंदिरात आहेत आणि रामदेव बाहेर आहेत. सर्व महत्त्वाचे लोक बाहेर आहेत. त्यांना (पीएम मोदी) सर्व काही एकट्याने करायचे आहे. तुम्ही एकटेच सर्वकाही करत असाल तर इतरांकडे मते का मागता? अशी विचारणा त्यांनी केली.**



यावेळी त्यांनी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यावर राजकीय निशाणा साधला आणि त्यांना धर्मांतरित मुख्यमंत्री म्हटले. ते म्हणाले की, "आसाममध्ये जो आम्हाला सोडून भाजपमध्ये आला तो 'नवा धर्मांतरित मुख्यमंत्री' आहे. तो आम्हाला धमक्या देत आहे. भाजपच्या लोकांनी यात्रेवरही हल्ला केला, वाहनांच्या काचा फोडल्या आणि पोस्टर्स आणि बॅनर फाडले."काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, "येथील (आसाम) मुख्यमंत्री हे विसरतात की त्यांच्यावरच असंख्य घोटाळ्यांचे आरोप आहेत, त्यांच्यावर अनेक कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. आसामचे मुख्यमंत्री हे देशातील सर्वात भ्रष्ट मुख्यमंत्री आहेत, असे राहुल गांधी बरोबर म्हणाले. ते सत्य आहे आणि जर ते स्वच्छ होत असतील तर त्यामागे फक्त मोदी आणि अमित शहा यांच्या वॉशिंग मशीनचे आश्चर्य आहे. भारत जोडो न्याय यात्रेवर झालेल्या हल्ल्याबाबत खरगे म्हणाले की, भाजपचे लोक राहुल गांधींच्या दौऱ्याला घाबरले आहेत. हे लोक जयराम रमेश यांच्या वाहनावर हल्ला करत आहेत, पण ते काँग्रेसचे सैनिक आहेत. ते घाबरत नाहीत. आमचे लोक तुरुंगात गेले. आम्ही इंग्रजांना घाबरत नाही तर भाजपला का घाबरणार? त्यांनी सांगितले की, राहुल गांधी कन्याकुमारी ते काश्मीरला जात असताना दगडफेक झाली नाही. त्यावेळी लाखोंच्या संख्येने लोक मिरवणुकीत सहभागी झाले होते, पण आसाममध्ये हल्ला का झाला?, पंतप्रधान मोदींचे शिष्य असल्यामुळे येथे हल्ला होत आहे. तो अल्पसंख्याकांना धमकावतो. आज या देशात भाजपला प्रत्येक राज्यात दिल्लीतून सरकार चालवायचे आहे आणि एक देश, एक निवडणूक, एक विचारधारा लादायची आहे.अयोध्या आणि अयोध्येतील श्रीराम मंदिरासह जगभरातील सर्व श्रीराम भक्तांना प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे वेध लागले आहेत. पाचशे वर्षांपासूनची प्रतीक्षा संपायला केवळ एक दिवस उरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुख्य उपस्थितीत सोमवारी दुपारी १२.२० ते १ या वेळेत प्राणप्रतिष्ठेचा मुख्य कार्यक्रम होईल. या आधी त्यांनी आज (दि.२१) राम सेतूचे मूळ ठिकाण अरिचल मुनईला भेट दिली. तामिळनाडूतील धनुषकोडी येथील श्री कोठंडाराम स्वामी मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पूजा केली. कोठंडाराम या नावाचा अर्थ धनुष्य असलेला राम, असा आहे. यादरम्यान त्यांनी राम सेतूचे मूळ ठिकाण असलेल्या अरिचल मुनईला भेट दिली.तामिळनाडूतील अरिचल मुनई पॉईंट येथून राम सेतू सुरू होतो. तिथे भगवान श्री राम यांनी रावणाचा पराभव करण्याचे व्रत घेतले होते. ही पवित्र माती जिथून प्रभू राम लंकेला गेले, ती भारताच्या लवचिकतेचे आणि कोणत्याही आव्हानावर विजय मिळवण्याच्या क्षमतेचे प्रतीक मानले जाते. राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेसाठी पंतप्रधान मोदी उद्या अयोध्येला जाणार असल्याने या भेटींना खूप महत्त्व आहे.यावेळी त्यांनी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यावर राजकीय निशाणा साधला आणि त्यांना धर्मांतरित मुख्यमंत्री म्हटले. ते म्हणाले की, "आसाममध्ये जो आम्हाला सोडून भाजपमध्ये आला तो 'नवा धर्मांतरित मुख्यमंत्री' आहे. तो आम्हाला धमक्या देत आहे. भाजपच्या लोकांनी यात्रेवरही हल्ला केला, वाहनांच्या काचा फोडल्या आणि पोस्टर्स आणि बॅनर फाडले."काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, "येथील (आसाम) मुख्यमंत्री हे विसरतात की त्यांच्यावरच असंख्य घोटाळ्यांचे आरोप आहेत, त्यांच्यावर अनेक कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत.

### राम मंदिर उडवणार

गँगस्टर दाऊद इब्राहिमचा साथीदार असल्याचं सांगत अयोध्येतील राम मंदिर उडवून देण्याची धमकी देणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. बिहारमधील अररिया जिल्ह्यातील तरुणाने पोलिसांना फोन करुन २२ जानेवारीला राम मंदिर उडवून देण्याची धमकी दिली होती. आपण दाऊदचे साथीदार असल्याचंही त्याने पोलिसांना सांगितलं होतं. अलुआ कालीयागंजमधून शुक्रवारी रात्री पोलिसांनी इंतेखाब आलमला अटक केली आहे. अररियाचे एसपी अशोक कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुण मानसिकदृष्ट्या अस्थिर आहे.

# आसाममध्ये भारत जोडो यात्रेवर हल्ला

## भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे विरोध

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी १४ जानेवारी रोजी मणिपूर राज्यातून भारत जोडो यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याला म्हणजेच भारत जोडो न्याय यात्रेला सुरूवात केली. त्यानंतर १८ जानेवारी रोजी यात्रेचा आसाम राज्यात प्रवेश झाला. दि. २५ जानेवारी पर्यंत ही यात्रा आसामच्या विविध जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार आहे. मात्र तत्पूर्वी आसाममधील कडव्या भाजपा सरकाराचा सामना काँग्रेसला करावा लागत आहे.**



काँग्रेसचे संवाद विभागाचे प्रमुख आणि राज्यसभेचे खासदार जयराम रमेश यांनी म्हटले की, आसामच्या सुनीतपूर भागातील जमुगुरीघाट येथून प्रवास करत असताना भाजपा समर्थकांनी माझ्या गाडीवर हल्ला केला. या हल्ल्याचा एक व्हिडिओ आता काँग्रेसच्या वतीने सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेला आहे.जयराम रमेश म्हणाले की, आम्ही जमुगुरीघाट येथून जात असताना भाजपाचे झेंडे हाती धरलेल्या एका अनियंत्रित जमावाने माझ्या गाडीला घेरले. त्यांनी गाडीला लावलेले भारत जोडो न्याय यात्रेचे स्टिकर फाडून टाकले. तसेच यात्राविरोधात घोषणाबाजी केली आणि गाडीच्या काचेवर पाणी फेकले. मात्र आम्ही शांत राहून त्यांना कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीच्या माध्यम समन्वयक महिमा सिंह यांनी या घटनेबद्दल एएनआय वृत्तसंस्थेला प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आमच्या वाहनांवर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. वाहनावरील काँग्रेसचे स्टिकर फाडून टाकत त्यांनी गाडीच्या मागे भाजपाचे झेंडे लावले. आमच्या सोशल मीडिया टीमलाही त्रास दिला. तसेच एका माध्यमकर्मीचा कॅमेरा पळविला. त्यामुळे आम्ही पोलिसांना याठिकाणी घेऊन आलो आहोत. माध्यमांना तरी त्रास देऊ नका, अशी विनंती पोलिसांना केली आहे.या घटनेनंतर सोनितपूरच्या अतिरिक्त पोलिस अधिक्षक मधुरिमा दास म्हणाल्या की, काँग्रेसच्या ताफ्यावर काहींनी हल्ला केला असे आम्ही ऐकून आहोत. त्या प्रकरणी आम्ही चौकशी करत आहोत.शनिवारी (दि. २० जानेवारी) खासदार जयराम रमेश यांनी पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सर्मा यांच्यावर टीका केली होती.

# प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जे. पी. नड्डा राहणार अनुपस्थित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारी म्हणजेच उद्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन केले आहे. यानिमित्त देशभरातील भाविक आणि व्हीव्हीआयपी मंडळी अयोध्येत दाखल होत आहेत. भाजपासाठी हा कार्यक्रम अतिमहत्त्वाचा आहे. त्यामुळे भाजपाचे राष्ट्रीय फळीतील अनेक नेते येथे उपस्थित राहणार आहेत. मात्र, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित राहणार नसल्याचं समोर येत आहे. जे.पी.नड्डा यांनी याबाबत एक्सवर सविस्तर पोस्ट लिहिली आहे. शनिवारी X वर एका पोस्टमध्ये त्यांनी २२ जानेवारीच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी आमंत्रित केल्याबद्दल मंदिराच्या बांधकाम आणि व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे आभार मानले. ते पोस्टमध्ये म्हणाले की, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासातर्फे मला अयोध्यामध्ये श्री राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आमंत्रण मिळाले आहे. याबाबत मी श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाचे आभार मानतो. ५०० वर्षांच्या संघर्षानंतर राम मंदिराचं भव्य निर्माण होताना पाहण्याचं भाग्य आपल्याला मिळालं आहे. मी प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमानंतर लवकरच सहकुटुंब दर्शनासाठी अयोध्येत जाणार आहे. दरम्यान, प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अयोध्येत मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रामभक्तांनी २२ जानेवारी रोजी अयोध्येत येऊ नये, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच केलं होतं. तसंच, प्राणप्रतिष्ठा सोहळा ऑनलाईन दाखवण्यात येणार आहे. या सोहळ्याचे प्रक्षेपण ठिकठिकाणी मोठ्या स्क्रीनवर दाखवण्यात येणार आहे.

# 'मैदान'ईदच्या दिवशी येणार प्रेक्षकांच्या भेटीला



बॉलिवूड अभिनेता अजय देवगण याचा बहुप्रतिक्षित 'मैदान' या सिनेमाची रिलिज डेट पुढे ढकलण्यात आली आहे. हा सिनेमा आता एप्रिल महिन्यात ईदच्या दिवशी प्रदर्शित होणार आहे. अजय देवगणचा चाहता वर्ग मोठा आहे. गेल्या 3 दशकांपासून तो बॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. अजय देवगणच्या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतात. हा सिनेमा 1 वर्षापूर्वीच प्रदर्शित होणार होता. मात्र, प्रत्येकवेळी कोणत्यातरी कारणामुळे रिलीज डेट पुढे ढकलण्यात येत होती. मात्र, आता हा सिनेमा एप्रिलमध्येच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांच्या माहितीनुसार, हा सिनेमा या वर्षीच्या ईद दिवशी रिलीज होणार आहे. तरण सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मवरुन ही माहिती दिली आहे. अजयच्या या सिनेमाचे पोस्टर त्यांनी शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये अजय देवगण सिरियस लूकमध्ये दिसत आहे. पोस्टरमध्ये त्याच्या शेजारी अनेक लोग पाहायला मिळत आहेत. तरणने शेअर केलेली ही पोस्ट सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली आहे. अजय देवगणचा मैदान हा चित्रपट बोयग्राफी आहे. एका खेळाडूची ही कहाणी आहे. बोनी कपूरने या सिनेमाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात इंडियन फुटबॉलच्या सुवर्णकाळातील आहे. मैदानात अजय देवगण फुटबॉलच्या कोच सय्यद अब्दुल रहीम यांची भूमिका निभावताना दिसत आहे. सिनेमात मी अजय देवगणच्या समवेत दाक्षिणात्य अभिनेत्री प्रियामणई, नितांशी गोयल, आमिर अली शेख, भरत जयराम, आर्यन भौमिक, गजराज राव, रुद्रनील घोष, रोहित मंडल, ऋषभ जोशी, डिएगो टोरेस कुरी, जीएण टोनॉय, अमर्त्य रे, मधुर मित्तल आणि कृष्णा सजनानीही भूमिकेत दिसणार आहेत. तर दुसरीकडे आणखी एका चित्रपटाची चर्चा सुरु झाली आहे.

# सुशांतच्या जन्मदिवसानिमित्ताने बहिणीची पोस्ट




हरहुन्नरी दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतचा आज जन्मदिवस आहे. त्यामुळे सध्या त्याचे चाहते आणि इतर कलाकार मंडळी सोशल मीडियाद्वारे त्याच्या आठवणी शेअर करत जन्मदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. सुशांतची बहीण श्वेता सिंह किर्तीने अभिनेत्याचा एक व्हिडीओ शेअर करत त्याला खास अंदाजात शुभेच्छा दिल्या आहेत. सुशांतची बहीण श्वेता ही सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. नेहमी सुशांतच्या आठवणी शेअर करत असते.

काही दिवसांपूर्वी तिने सुशांतची पूर्वाश्रमीची गर्लफ्रेंड अंकिता लोखंडेच्या समर्थनार्थ पोस्ट शेअर केली होती. त्यानंतर आज तिने भावाच्या जन्मदिवसानिमित्ताने खास पोस्ट शेअर केली आहे.श्वेताचे सुशांतचा एक व्हिडीओ शेअर करत लिहिलं आहे, “माझ्या सोन्यासारख्या भावाला जन्मदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. मी तुझ्यावर अमर्यादित प्रेम करते. मला आशा आहे की, तू लाखो लोकांच्या हृदयात आहेस आणि तू त्यांना काहीतरी करण्यासाठी आणि चांगले बनण्यासाठी प्रेरित करत आहेस. तुझा वारसा पुढे चालत राहिलं. जन्मदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा स्टार. तू नेहमी चमकत राहा आणि आम्हाला मार्ग दाखव.”श्वेता सिंह किर्तीच्या या पोस्टवर सुशांतच्या चाहत्यांनी तसेच काही कलाकारांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. सर्वजण सुशांतला जन्मदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. दरम्यान, २१ जानेवारी १९८६ रोजी सुशांतचा बिहारमध्ये जन्म झाला होता. त्याने अभिनय क्षेत्रातील सुरुवात ‘किस देश में है मेरा दिल’ या मालिकेपासून केली होती. पण तो ‘पवित्र रिश्ता’ या मालिकेमुळे लोकप्रिय झाला. त्यानंतर सुशांतने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. मग त्याने अनेक हिट चित्रपट बॉलीवूडला दिले. पण १४ जून २०२०मध्ये मुंबईतील राहत्या घरी त्याने गळफास लावून आत्महत्या केली. आज सुशांत आपल्या नसला तरी त्याच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

# कंगना करू लागली समाजसेवा

संपूर्ण देशासाठी उद्याचा दिवस (२२ जानेवारी) खूप मोठा दिवस असणार आहे. अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या ऐतिहासिक दिवसांसाठी देशातील लोक खूप उत्साहित आहेत. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी हजेरी लावणार आहेत. त्यामुळे बरेच सेलिब्रिटी अयोध्येला रवाना होताना दिसत आहेत. बॉलीवूडची ‘कॉन्ट्रोव्हर्सी क्वीन’ कंगना रणौत रामनगरीत पोहोचली आहे. तिचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.अभिनेत्री कंगना रणौत शनिवारी अयोध्येत पोहोचली. आज अभिनेत्री संस्कृत विज्ञान पद्म विभूषण स्वामी रामभद्राचार्य महाराज यांना भेटली. या भेटीचे फोटो कंगनाने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये कंगना रामभद्राचार्य यांचे आशीर्वाद घेताना दिसत आहे. अशातच कंगनाचा दुसऱ्याबाजूला एक व्हिडीओ चांगलाच चर्चेत आला आहे.कंगनाने इन्स्टाग्राम स्टोरीवर हा व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये अभिनेत्री समाजसेवा करताना दिसत आहे. कंगना साडीतच एका हनुमात मंदिरात झाडू मारताना पाहायला मिळत आहे. हा व्हिडीओ शेअर करत कंगनाने लिहिलं आहे.



# ‘मैं अटल हूं’च्या कमाईत मोठी वाढ

अभिनेता पंकज त्रिपाठींचा बहुचर्चित चित्रपट ‘मैं अटल हूं’ चित्रपट १९ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला. भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट आहे. या चित्रपटात पंकज त्रिपाठींनी अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारली आहे. पहिल्याच दिवशी या चित्रपटाने खूप कमी कमाई केली होती. आता या चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत. अटल बिहारी वाजपेयी यांच्या बायोपिकची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. ‘मैं अटल हूं’ चे दोन ट्रेलर प्रदर्शित करण्यात आले. प्रेक्षकांकडून या ट्रेलर्सना भरभरुन प्रतिसाद मिळाला होता. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांकडून या चित्रपटाला अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

# 'श्रीदेवी प्रसन्न' सिनेमातील नवं गाणं आऊट

सई ताम्हणकर (SAI TAMHANKAR) आणि सिद्धार्थ चांदेकर (SIDDHARTH CHANDEKAR) अभिनीत 'श्रीदेवी प्रसन्न' (SRIDEVI PRASANNA) हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच आता या सिनेमातील 'श्रीदेवी प्रसन्न' (SRIDEVI PRASANNA) हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.'श्रीदेवी प्रसन्न' या सिनेमाच्या माध्यमातून सई ताम्हणकर आणि सिद्धार्थ चांदेकर यांची फ्रेश जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. टीझर आणि ट्रेलरला मिळालेल्या रिस्पॉन्सने बोल्ड ब्युटीफुल सई व चॉकलेट बॉय सिद्धार्थ यांच्या फिल्मसाठी लोक किती उत्सूक आहेत ते सिद्ध केलं आहेच. येत्या 2 फेब्रुवारीला हा सिनेमा सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'श्रीदेवी प्रसन्न' या फ्रेश चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल विमल मोढवे आणि लेखन अदिती मोघे यांनी केले आहे. सहकुटुंब सहपरिवार एन्जॉय करता येईल अशी लोकांपर्यंत आणावी हाच या चित्रपटामागचा थॉट आहे. 'श्रीदेवी प्रसन्न' या सिनेमात सई ताम्हणकर आणि सिद्धार्थ चांदेकर मुख्य भूमिकेत आहेत. सुलभा आर्य, संजय मोने, वंदना सरदेसाई, शुभांगी गोखले, रमाकांत दायमा यांच्या सारख्या मातब्बर कलाकारांसोबत सिनेमात सिद्धार्थ बोडके, रसिका सुनील, समीर खांडेकर, आकांक्षा गाडे, राहुल पेठे, पल्लवी परांजपे, पूजा वानखेडे, सिद्धार्थ महाशब्दे, जियांश पराडे हे तरुण कलाकार देखील महत्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहेत.

# मैदानात प्रभू श्रीरामाची मुद्रा!

## शतक झळकावल्यानंतर केएस भरतचे अनोखे सेलिब्रेशन

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यात २५ जानेवारीपासून पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. त्याआधी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात टीम इंडियाचा यष्टीरक्षक फलंदाज केएस भरतने शानदार शतक झळकावले आहे. शतक झळकावल्यानंतर केएस भरतने अशा प्रकारे सेलिब्रेशन केले की, ते आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**

केएस भरतने इंग्लंड लायन्सविरुद्ध शानदार फलंदाजी करत नरेंद्र मोदी स्टेडियमवर शतक झळकावले. शतक झळकावल्यानंतर केएस भरतने मैदानाच्या मध्यभागी अशा प्रकारे सेलिब्रेशन केले की, त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून चाहत्यांना आवडत आहे. खरं तर, शतक झळकावल्यानंतर केएस भरतने 'धनुष्यातून बाण सोडत असल्याचा' हावभाव केले. केएस भरत यांनी आपले शतक प्रभू रामाला समर्पित केले आहे. वास्तविक, २२ जानेवारीला अयोध्येत भगवान राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम आहे. या काळात संपूर्ण देश प्रभू श्रीरामाच्या भक्तीत तल्लीन झाला आहे. केएस भरतनेही हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये केएस भरत यांनी लिहिले की, 'लक्षात ठेवण्यासारखे आहे, हॅशटॅग जय श्री राम.'२५ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी विकेटकीपर फलंदाज केएस भरतचा टीम इंडियात समावेश करण्यात आला आहे.

केएस भरत कसोटी मालिकेपूर्वी जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याचा उत्कृष्ट फॉर्म पाहता आता कर्णधार रोहित शर्मा त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी देऊ शकतो असे दिसते. केएस भरतने टीम इंडियासाठी आतापर्यंत फक्त पाच कसोटी सामने खेळले आहेत, ज्यात



त्याने १२९ धावा केल्या आहेत. केएस भरत व्यतिरिक्त आणखी दोन यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल आणि ध्रुव जुरेल यांचाही टीम इंडियात समावेश करण्यात आला आहे.भारताविरुद्ध २५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी इंग्लंड संघाला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा स्टार फलंदाज हॅरी ब्रूक भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत सहभागी होणार नाही. हॅरी ब्रूक वैयक्तिक कारणांमुळे इंग्लंडला परतत असून कसोटी मालिका खेळण्यासाठी तो पुन्हा भारतात येणार नसल्याचे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने एक निवेदन जारी केले आहे. हॅरी ब्रूकच्या बदलीची घोषणा अद्याप ईसीबीने केलेली नाही. मात्र, ब्रूकच्या अनुपस्थितीमुळे इंग्लंडच्या बॅझबॉल शैलीला मोठा फटका बसणार आहे. ईसीबीने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, "हॅरी ब्रूक वैयक्तिक कारणांमुळे भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतून तात्काळ माघार घेतली आहे, तो भारत दौऱ्यावर संघाचा भाग असणार नाही. हॅरी ब्रूक कसोटी मालिका खेळण्यासाठी भारतात परतणार नाही. या कठीण काळात ब्रूकच्या कुटुंबीयांनी गोपनीयतेचे आवाहन केले आहे.

ब्रूकच्या कुटुंबाच्या गोपनीयतेची काळजी घेतली जावी आणि त्यांच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप केला जाऊ नये, अशी आमची इच्छा आहे. ब्रूकच्या बदलीची घोषणा ईसीबीकडून लवकरच केली जाईल."मात्र, ब्रूकच्या अनुपस्थितीमुळे इंग्लंडच्या बॅझबॉल शैलीला मोठा फटका बसणार आहे. ईसीबीने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, "हॅरी ब्रूक वैयक्तिक कारणांमुळे भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतून तात्काळ माघार घेतली आहे, तो भारत दौऱ्यावर संघाचा भाग असणार नाही. हॅरी ब्रूक कसोटी मालिका खेळण्यासाठी भारतात परतणार नाही. या कठीण काळात ब्रूकच्या कुटुंबीयांनी गोपनीयतेचे आवाहन केले आहे. केएस भरतने इंग्लंड लायन्सविरुद्ध शानदार फलंदाजी करत नरेंद्र मोदी स्टेडियमवर शतक झळकावले. शतक झळकावल्यानंतर केएस भरतने मैदानाच्या मध्यभागी अशा प्रकारे सेलिब्रेशन केले की, त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून चाहत्यांना आवडत आहे. खरं तर, शतक झळकावल्यानंतर केएस भरतने 'धनुष्यातून बाण सोडत असल्याचा' हावभाव केले. केएस भरत यांनी आपले शतक प्रभू रामाला समर्पित केले आहे. वास्तविक, २२ जानेवारीला अयोध्येत भगवान राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम आहे.

### ब्रूक हा कसोटी क्रिकेटचा पुढचा स्टार

हॅरी ब्रूक हा इंग्लंडच्या मधल्या फळीतील सर्वात धोकादायक खेळाडूंपैकी एक आहे. कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून, ब्रूक हा सतत चर्चेचा विषय बनला आहे. त्याच्याकडे क्रिकेट जगतातील पुढील सर्वात मोठा स्टार म्हणून पाहिले जात आहे. ब्रूकने आतापर्यंत १२ कसोटी सामने खेळताना ११८१ धावा केल्या आहेत. या काळात ब्रुकची सरासरी ६२.१६ राहिली आहे. एवढेच नाही तर ब्रूकने कसोटी क्रिकेटमध्ये ४ शतके आणि ७ अर्धशतकेही केली आहेत. अलीकडेच, हॅरी ब्रूकला आयपीएलच्या १७ व्या हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्सने ४ कोटी रुपयांची बोली लावून विकत घेतले.

# युजवेंद्र चहलपेक्षा धाडसी फिरकी गोलंदाज नाही

## चहलच्या भारतीय संघातील स्थानाबद्दल हरभजन सिंगची प्रतिक्रिया

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तान टी-२० मालिकेसह टीम इंडियाने टी-२० वर्ल्ड कपच्या तयारीला अंतिम रूप देण्यास सुरुवात केली होती. आयपीएलदरम्यान ही तयारी आणखी मजबूत करावी लागेल. काही खेळाडूंना टी-२० विश्वचषक संघासाठी आधीच चिन्हांकित केले गेले आहेत. आता काही खेळाडू आयपीएल कामगिरीच्या आधारे संघात स्थान मिळवतील. अशा स्थितीत या स्पर्धेसाठी कोणत्या खेळाडूंना तिकीट मिळणार याची चर्चा सुरू आहे.**

या क्रमाने, माजी फिरकीपटू हरभजन सिंगला जेव्हा टी-२० संघासाठी तीन फिरकी गोलंदाजांची निवड करण्यास सांगण्यात आले, तेव्हा त्याने सर्वप्रथम युजवेंद्र चहलचे नाव घेतले.सध्या युझवेंद्र चहलची फार कमी चर्चा आहे. आयपीएलच्या जवळपास प्रत्येक मोसमात चमकदार गोलंदाजी करूनही गेल्या काही वर्षांपासून तो टीम इंडियामध्ये नियमित स्थान मिळवू शकलेला नाही. यावेळीही त्याला टी-२० वर्ल्डमध्ये स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे. संघाच्या शर्यतीत त्याचे नाव दिसत नाही. इथे फक्त कुलदीप यादव, रवी बिश्नोई, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर आणि अक्षर पटेल यांचीच चर्चा होत आहे. अशा परिस्थितीत हरभजन सिंगनेही चहलबाबत






मोठी टिप्पणी केली आहे.यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या आयएल टी-२० च्या प्रसंगी गप्पा मारताना हरभजन सिंग म्हणाला, "मी प्रथम युजवेंद्र चहलला टी-२० वर्ल्ड कप संघात ठेवणार आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. हे असे का आहे हे मला माहित नाही. त्यालाही हे माहीत नसेल. पण आज देशात त्याच्यापेक्षा चांगला लेगस्पिनर नाही. त्याच्यापेक्षा धाडसी फिरकी गोलंदाज कोणी असेल असे मला वाटत नाही. त्याचे अतिशय चाणाक्ष आहे." हरभजन सिंग पुढे म्हणाला, "दुसरा फिरकीपटू म्हणून मी रवींद्र जडेजाची निवड करेन. तुम्हाला ऑफस्पिनरचीही गरज आहे आणि वॉशिंग्टन सुंदर त्यासाठी योग्य आहे. आता निवडकर्ते काय विचार करतात, संघ व्यवस्थापन काय विचार करते ही वेगळी गोष्ट आहे."यूएसए आणि वेस्ट इंडिजमधील खेळपट्ट्यांमधून फिरकीपटूंना महत्त्वपूर्ण मदत मिळेल, असा विश्वास भारताचा माजी ऑफस्पिनर आहे. अशा स्थितीत टीम इंडियाला आपल्या फिरकी आक्रमणावर अधिक जोर देण्याची गरज आहे. तो म्हणाला, "तिथल्या खेळपट्ट्या भारतासारख्या असतील. फिरकीपटू मोठी भूमिका बजावतील. मी अनेक प्रसंगी वेस्ट इंडिजला गेलो आहे आणि माझ्या लक्षात आले आहे की फिरकीपटूंना नेहमी काहीतरी ऑफर असते. त्यामुळे योग्य गोलंदाज निवडणे महत्त्वाचे आहे. आपण परिस्थितीकडे दुर्लक्ष करू शकत नाही कारण ती उपखंडासारखीच असेल. त्यामुळे परिस्थिती लक्षात घेऊन संघ बनवावा लागेल. तुम्हाला संघात किमान तीन फिरकीपटू ठेवण्याची गरज आहे." हे असे का आहे हे मला माहित नाही. त्यालाही हे माहीत नसेल. पण आज देशात त्याच्यापेक्षा चांगला लेगस्पिनर नाही.

### त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे

यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या आयएल टी-२० च्या प्रसंगी गप्पा मारताना हरभजन सिंग म्हणाला, "मी प्रथम युजवेंद्र चहलला टी-२० वर्ल्ड कप संघात ठेवणार आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. हे असे का आहे हे मला माहित नाही. त्यालाही हे माहीत नसेल. पण आज देशात त्याच्यापेक्षा चांगला लेगस्पिनर नाही.